## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
## महाराष्ट्र, पुणे.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२३-२४

### अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गट

### । शैक्षणिक नवोपक्रमाचे नाव ।




# चला करू प्रगत वर्ग

### • उपक्रम सादरकर्ता •


## डॉ गणपती कमळकर

गटशिक्षणाधिकारी,

पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर


### • मार्गदर्शक •

मा.श्रीमती मीना शेंडकर

शिक्षणाधिकारी(प्राथमिक),जि.प.कोल्हापूर

# नवोपक्रम कर्ता परिचय



| | |
|---|---|
| नाव | डॉ.गणपती बंडा कमळकर |
| पदनाम | गटशिक्षणाधिकारी |
| कार्यालय | शिक्षण विभाग पंचायत समिती कागल,जि.कोल्हापूर |
| नवोपक्रमाचा गट | अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गट |
| शैक्षणिक अर्हता | एम.ए (इतिहास,मराठी) एम.एड्,डी.एस.एम, सेट, एम.फिल.पीएचडी, |
| ई मेल | ganapati.kamalkar@gmail.com |
| युटूब चॅनेल | Ganapati Kamalkar |
| नोकरी सुरु तारीख | ०५।०७।२०११ |
| एकूण सेवा | १२ वर्षे |
| मुळ गांव | मु.पो.मळगे बु।। ता.कागल जि.कोल्हापूर |
| नवोपक्रमाचे नाव | चला करू प्रगत वर्ग |
| नवोपक्रमाचा कालावधी | १० महिने |
| संपर्क क्रमांक | ९४२१७४७६८५ / ९४२११०९०९३ |

# अनुक्रमणिका



| अ.नं. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | नवोपक्रमाचे शीर्षक | १ |
| २. | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | २ |
| ३. | नवोपक्रमाच उद्दिष्टै | ४ |
| ४. | नवोपक्रमाचे नियोजन | ५ |
| ५. | नवोपक्रमाचे कार्यपद्धती | ७ |
| ६. | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती(उद्दिष्टानुसार) | १२ |
| ७. | समारोप | १६ |
| ८. | संदर्भसूची व परिशिष्ट | १८ |
| ९. | नवोपक्रमामधील यशस्वी शिक्षक यादी | १९ |

# प्रास्ताविक

चला करू प्रगत वर्ग अभियान सन २०२२-२३

प्रत्येक मूल ही राष्ट्राची संपत्ती आहे त्यामुळे शिक्षणात मुलाला केंद्रबिंदू मानण्यात आले आहे. याचा अर्थ प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलाची प्रगती झाली तर कुटुंबाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती होत असते. त्यामुळे शाळेत प्रवेश घेतलेले प्रत्येक मूल शिकणे महत्त्वाचे आहे. पण आज १००% मुले शिकत नसल्याचे विविध संस्थांच्या तसेच शासन स्तरावरील अहवालातून स्पष्ट होताना दिसत आहे. यात खालील बाबी स्पष्ट दिसून येतात एकंदरीत १००% मुले शिकण्यामध्ये खालील अडचणी दिसून येतात.

१. सक्तीच्या वयोगटातील १००% मुले शाळेत दाखल होत नाहीत.

२. शाळेत दाखल झालेली सर्व मुले टिकत नाहीत

३. शाळेत दाखल झालेली १००%मुले शिकत नाहीत

१००% मुले न शिकण्या पाठीमागे महत्त्वपूर्ण कारणे आहेत. ती म्हणजे काही मुले गतिमंद असतात. तर काही मुले मतिमंद असतात. वस्तूस्थिती जाणून घेतली तर मतिमंद विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. पण गतिमंद विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. यासाठी महाराष्ट्रासाठी विविध उपाययोजना, प्रयत्न करणे आवश्यक आहे. दिनांक २२ जून २०१५ च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्रातील शाळांमध्ये नियमितपणे जाणार्या प्रत्येक मुलाने मूलभूत अध्ययन क्षमता प्राप्त करणे कोणतेही मूल अभ्यासात मागे न राहणे हे ध्येय होते. याकरिता अधिकार्यांनी, शाळा व्यवस्थापनाने व महत्त्वाचे म्हणजे शिक्षकांनी या कार्यक्रमाला गती दिली सन २०१४ ते १६ व १८ च्या असर (अडएठ) अहवालानुसार या कार्यक्रमास प्रचंड यश मिळाले.

तथापि कोविड १९ च्या वैश्विक महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला. मार्च २020 पासून विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य म्हणून शाळा बंद कराव्या लागल्या त्यानंतर थोड्या काळासाठी पुन्हा चालू, पुन्हा बंद असा लपंडाव सुरू झाला. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दूरगामी परिणाम झाले. वर्ष, दीड वर्ष शाळा बंद राहिल्यामुळे बहुतांशी ठिकाणी पहिली इयत्ता शिकविणार्या शिक्षकांची ओळख न होताच विद्यार्थी दुसर्या इयत्तेत गेले. त्यामुळे विद्यार्थ्यांना मूलभूत अध्ययन क्षमता प्राप्त झाल्या नाहीत २२ जून २०१५ च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयानुसार प्रत्येक मूल शिकले पाहिजे यावर लक्ष केंद्रित करून केलेले कार्य प्रभावी बनत चालले होते. पण कोविड १९ मुळे यात व्यत्यय निर्माण झाला त्यामुळे शासनाने निपुण भारत मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान अभियान शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ रोजी घेतला या शासन निर्णयानुसार राज्यात सन २०२६ ते २७ पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या शंभर टक्के विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता तिसरी पुढे गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

तालुक्यातील स्थिती तालुक्यातील शाळांना भेटी दिल्यानंतर व तपासणी केल्यानंतर भाषिक कौशल्य व संख्याज्ञान यामध्ये पंधरा ते वीस टक्के विद्यार्थी इयत्ता निहाय पहिली ते आठवी पाठीमागे असल्याचे दिसून येते याला कोविड १९ ची परिस्थिती देखील कारणीभूत आहे. जिल्हा परिषद शाळा बरोबरच इतर व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये देखील हीच किंबहुना यापेक्षा जास्त विद्यार्थी भाषा व गणित या विषयांमधील मूलभूत क्षमता प्राप्त नसलेले आढळून आले.

चला करू प्रगत वर्ग अभियानाची आवश्यकता १५ ते २०% इतक्या संख्येने अप्रगत असणार्या विद्यार्थ्यांसाठी भाषा व गणित मूलभूत क्षमता प्राप्त नसल्यास काहीतरी उपाय योजना करणे आवश्यक होते. शिवाय हे विद्यार्थी असेच अप्रगत राहिले तर त्यांच्या भावी शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होण्याची तसेच या विद्यार्थ्यांना आपल्याला काही येत नाही हा न्यूनगंड त्यांच्या मनामध्ये निर्माण होऊन ती शाळाबाह्य होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा अशा विद्यार्थ्यांच्या कडे शिक्षकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी चला करू प्रगत वर्ग या अभियानाची गरज वाटते मुळात अशा विद्यार्थ्यांच्या कडे पाहण्याचा दृष्टिकोन बहुतांशी शिक्षकांचा नकारात्मक दिसून येतो त्यामुळे काही वेळा हे विद्यार्थी वर्गामध्ये दुर्लक्षित राहू शकतात अशावेळी शिक्षकांचा या विद्यार्थ्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे प्रेरणा देणे आवश्यक होते.

तथापि अप्रगत राहिले म्हणून त्यांना जबाबदार धरण्यापेक्षा त्यांचे लक्ष अशा विद्यार्थ्यांच्याकडे वेधून त्यांना प्रोत्साहित करणे संयुक्तिक वाटते माजी शिक्षण सचिव मा. नंदकुमार सर नेहमी म्हणत शिक्षक काम करतात त्यांना प्रेरणा द्या या विचारानुसार कागल शिक्षण विभाग गेली पाच वर्षे काम करत आहे शिष्यवृत्ती, जि प प्रज्ञाशोध परीक्षेत उत्कृष्ट काम करणार्या शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांचा यथोचित गुणगौरव केला जातो यासाठी शिक्षक व इतर देणगीदारांमधून बारा लाखाची देणगी गोळा करून शिष्यवृत्ती गंगाजळी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षक झपाटून कामाला लागले काळ वेळ न पाहता समय दान उपक्रमाअंतर्गत काम करू लागले. दिवाळी, उन्हाळ्याची सुट्टी न घेता स्वतःला झोकून देऊन कामाला लागले यामुळे जिल्हा परिषद प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता चौथी व सातवी मध्ये कागल तालुका सलग पाच वर्षे जिल्ह्यात प्रथम स्थानी आहे तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत गेल्या चार वर्षात पाचव्या स्थानावरून जिल्ह्यात दुसर्या स्थानावर झेप घेतली आहे .

परिणामी शिक्षकांच्या मध्ये निकोप स्पर्धा चालू आहे स्पर्धा परीक्षेत कागल तालुक्याला उत्कृष्ट यश मिळाले आहे पण १००% मुले शिकण्यासाठी देखील प्रयत्न करणे आवश्यक आहे शिवाय पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा नवोदय व चौथी सातवी जि प प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय काम केलेल्या शिक्षकांचा गुणगौरव केला जातो पण इतर वर्गातील शिक्षकांचे काय या शिक्षकांना देखील प्रोत्साहित करणे आवश्यक आहे यांना देखील चांगले काम करण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक होते काही वेळा शाळा भेटी करत असताना या शिक्षकांच्या मध्ये निरुत्साह दिसून आला कारण यांना आव्हानात्मक काम नव्हते.

किंबहुना १००% प्रगत करणे देखील उत्कृष्ट काम आहे यावर त्यांचे लक्ष केंद्रित होत नव्हते शिवाय स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत विद्यार्थ्यांना आणणे हेच जसे महत्त्वाचे उल्लेखनीय काम आहे तसेच १००% वर्ग प्रगत करणे हे देखील उल्लेखनीय काम आहे हे त्यांच्या लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे यासाठी चला करू प्रगत वर्गअभियान अंतर्गत प्रत्येक मूल शिकण्यासाठी प्रयत्न करणे म्हणून हे अभियान राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

- डॉ. गणपती कमळकर
गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती कागल

## १. नवोपक्रमाचे शीर्षक

# "चला करू प्रगत वर्ग"

प्रत्येक मुल ही राष्ट्राची संपत्ती आहे...!

# २. नवोपक्रमाची गरज व महत्व

**'चला करू प्रगत वर्ग' नवोपक्रमाची गरज व महत्व**

प्रत्येक मूल ही राष्ट्राची संपत्ती आहे त्यामुळे शिक्षणात मुलाला केंद्रबिंदूमानण्यात आले आहे. याचा अर्थ प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलाची प्रगती झाली तर कुटुंबाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती होत असते. त्यामुळे शाळेत प्रवेश घेतलेले प्रत्येक मूल शिकणे महत्त्वाचे आहे. पण आज १००% मुले शिक त नसल्याचे विविध संस्थांच्या तसेच शासन स्तरावरील अहवालातून स्पष्ट होताना दिसत आहे. यात खालील बाबी स्पष्ट दिसून येतात एकं दरीत १००% मुले शिकण्यामध्ये खालील अडचणी दिसून येतात.

१. सक्तीच्या वयोगटातील १००% मुले शाळेत दाखल होत नाहीत.

२. शाळेत दाखल झालेली सर्व मुले टिकत नाहीत

३. शाळेत दाखल झालेली १००% मुले शिकत नाहीत १००% मुले न शिकण्या पाठीमागे महत्त्वपूर्ण कारणे आहेत. ती म्हणजे काही मुले गतिमंद असतात. तर काही मुले मतिमंद असतात. वस्तुस्थिती जाणून घेतली तर मतिमंद विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. पण गतिमंद विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. यासाठी जिल्हा परिषद शाळासाठी विविध उपाययोजना, प्रयत्न करणे आवश्यक आहे.

चला करू प्रगत वर्ग अभियानाची आवश्यक ता १५ ते २०% इतक्या संख्येने अप्रगत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भाषा व गणित मूलभूत क्षमता प्राप्त नसल्यास काहीतरी उपाय योजना करणे आवश्यक होते. शिवाय हे विद्यार्थी असेच अप्रगत राहिले तर त्यांच्या भावी शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होण्याची तसेच या विद्यार्थ्यांना आपल्याला काही येत नाही हान्यूनगंड त्यांच्या मनामध्ये निर्माण होऊन ती शाळाबाह्य होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा अशा विद्यार्थ्याकडे शिक्षक ांचे लक्ष वेधून घेण्यासाठी 'चला करू प्रगत वर्ग' या नवोपक्रमाची गरज वाटते मुळात अशा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बहुतांशी शिक्षकांचा नकारात्मक दिसून येतो त्यामुळे काही वेळा हे विद्यार्थी वर्गामध्ये दुर्लक्षित राहूशकतात अशावेळी शिक्षकांचा या विद्यार्थ्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे प्रेरणा देणे आवश्यक होते.

तथापि अप्रगत राहिले म्हणून त्यांना जबाबदार धरण्यापेक्षा त्यांचे लक्ष अशा विद्यार्थ्यांच्याक डे वेधून त्यांना प्रोत्साहित करणे संयुक्तिक वाट ते माजी शिक्षण सचिव मा.नंदकुमार सर नेहमी म्हणत शिक्षक काम करतात त्यांना प्रेरणा द्या या विचारानुसार जिल्हा परिषद कोल्हापूर शिक्षण विभाग गेली पाच वर्षे काम करत आहे शिष्यवृत्ती, जि.प.प्रज्ञाशोध परीक्षेत

उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहित क रण्यासाठी कागल तालुक्यातील तालुकास्तरावर त्यांचा यथोचित गुणगौरव कार्यक्रम घेतला जातो. स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत विद्यार्थ्यांना आणणे हे जसे महत्त्वाचे उल्लेखनीय काम आहे तसेच १००% वर्ग प्रगत करणे हे देखील उल्लेखनीय काम आहे हे त्यांच्या लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे. 'चला करू प्रगत वर्ग' नवोपक्रम अंतर्गत प्रत्येक मूल शिकण्यासाठी प्रयत्न करणे म्हणून हा नवोपक्रम तालुक्यमध्ये राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला होता.

# ३. नवोपक्रमाची उद्दिष्टे

१. प्रत्येक विद्यार्थ्याला प्रभुत्व पातळीकडे घेऊन जाणे.

२. गुणवत्ता 'वाढीसाठी पोषक वातावरण तयार करणे.

३. तसेच संपादणूक पातळी वाढविण्यासाठी शिक्षकांना साहाय्य करणे.

४. मूलभूत क्षमतांची परिपूर्ण तयारी करून घेणे.

५. जिल्हा परिषद शाळांच्या बाबतीत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे.

६. कोणतेही अभिलेखे/दप्तर ठेवण्याची आवश्यकता नाही, फक्त विद्यार्थी गुणवत्ता तपासणे हा एकमेव उद्देश या नवोपक्रमाचा आहे

# ४. नवोपक्रमाचे नियोजन

## प्रगत वर्ग संकल्पना

१. सदर नवोपक्रम जिल्हा परिषद शाळेतील १ ली ते ८ वी वर्गासाठी राबविण्यात आला.
२. १००% विद्यार्थी शाळेत येणे आवश्यक होते त्यांची शाळेत उपस्थिती आवश्यक होती.
३. १००% विद्यार्थ्यांना त्या त्या वर्गातील भाषा व गणित व इंग्रजी विषयातीलमूलभूत क्षमता प्राप्त होणे आवश्यक होते.(यामध्ये जिल्हा शल्यचिकित्सक यांचे मतिमंद/बहुविकलांग प्रमाणपत्र आहे असे विद्यार्थी वगळण्यात आले.)

प्रगत वर्ग निवडण्याचे निकष निपूण भारत/प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयानुसार हा नवोपक्रम कागल तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात आला.

१. प्रत्येक वर्गाचे भाषिक कौशल्य व संख्याज्ञान यांची तपासणी केली.
२. दाखल पात्रब विद्यार्थी व प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांच्या वरून वर्गनिहायप्रगत विद्यार्थ्यांची टक्केवारी ठरविले.
३. कागल तालुक्यात १० केंद्र असून प्रत्येक केंद्रात प्रत्येक इयत्तेचा एक प्रगत वर्ग निवडण्यात आला.
४. प्रगत वर्ग निवडताना अधिक विद्यार्थी संख्येचा विचार करण्यात आला.

## प्रगत वर्ग रेंकिंग टक्केवारी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले होते:

प्रगत वर्ग गुणानुक्रमाचे खालीलप्रमाणे सूत्र असेल.

$$\text{प्रगत वर्गाचे सूत्र} = \frac{\text{एकूण प्रगत विद्यार्थी संख्या} \times \text{एकूण गुण}}{१००}$$

## प्रत्येक केंद्रातून प्रत्येक इयत्तेचा प्रथम प्रगत वर्ग निवडण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समिती निश्चित करण्यात आली.

### केंद्रस्तरीय समिती

| अ.न. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | केंद्रप्रमुख | अध्यक्ष |
| २. | पदवीधर/विषय शिक्षक | सदस्य |
| ३. | उपक्रमशील शिक्षक | सदस्य |
| ४. | उपक्रमशील शिक्षिका | सदस्य |
| ५. | उपक्रमशील मुख्याध्यापक | सदस्य/सचिव |

## प्रत्येक इयत्तेचे प्रथम तीन प्रगत वर्ग निवडण्यासाठी खालीलप्रमाणे तालुकास्तरीय निवड समिती निश्चित करण्यात आली.

### तालुकास्तरीय समिती

| अ.न. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २. | अधिव्याख्याता/संपर्क अधिकारी | सदस्य |
| ३. | सर्व शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य |
| ४. | सर्व केंद्रप्रमुख सदस्य | सदस्य |
| ५. | ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य/सचिव |

**वरील क्युआर कोडद्वारे चला करू प्रगत वर्ग नवोपक्रामबद्दल अधिक माहिती जाणून घेता येईल.**

# ५. नवोपक्रमाचे कार्यपद्धती

**इयत्तानिहाय प्रगत वर्ग ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात आले होते.**

## • इयत्ता पहिली

"चला करूया प्रगत वर्ग " अभियान

निवडीचे निकष

इयत्ता पहिली

| | | भाषा | | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | जोडाक्षर विहित चार ओळींचा उतारा प्रकट वाचन | कविता सभिनाय पाठ असणे १ कविता | जोडाक्षर विरहीत किमान ५ शब्द वाचन | चित्रावर आधारित शब्द लेखन | शब्द शब्द सारनिवरून वाक्य तयार करणे | अक्षरावरून अर्थपूर्ण शब्द तयार करणे | १ ते १०० अंकात वाचन करणे | १ ते २० पर्यंतच्या संख्या अक्षरात लेखन करता येणे | २ अंकी संख्यांचे श्रुतलेखन फक्त अंकात | १ अंकी संख्या बेरीज | १ अंकी संख्या वजाबा की | १ अंकी सांख्याची शाब्दिक उदाहरणे सोडविता येणे बेरीज,वजा बाकी ,५ पैकी ३ | a to z पर्यंत अक्षर वाचन | १ कविता साभिन य सादर करता येणे | इंग्रजी सूचनेनुसार कृती करतो किमान ५ | action word नुसार कृती करतो किमान ५ | चार रेषीय अक्षरांचे लेखन करता येणे | स्वतःचा परिचय किमान ३ वाक्यात सांगता येणे |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## • इयत्ता दुसरी

"चला करूया प्रगत वर्ग " अभियान

निवडीचे निकष

इयत्ता दुसरी

| | | भाषा | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | जोडाक्षर युक्त चार ओळींचा उतारा प्रकट वाचन | कविता सभिनाय पाठ असणे १ कविता | जोडाक्षरयुक्त किमान २ वाक्य श्रुतलेखन | चित्रावर आधारित किमान ३ वाक्यात लेखन | शब्द सारनिवरून वाक्य तयार करणे | ५ शब्दांची शब्द साखळी तयार करणे | १ ते १०० अक्षर लेखन आले पाहिजे | २ अंकी संख्यांचे श्रुतलेखन फक्त अंकात | एकक व दशक ओळखता येणे | २ अंकी संख्या हातच्या ची बेरीज | २ अंकी संख्या हातच्या ची वजाबाकी | २ अंकी सख्याची शाब्दिक उदाहरणे सोडविता येणे बेरीज,वजा बाकी ,५ पैकी ३ | परिचित शब्दांचे वाचन किमान करतो ५ | १ कविता साभिनय सादर करता येणे | इंग्रजी सूचनेनुसार कृती /action word नुसार कृती करतो किमान ५ | one to twenty counts | तीन अक्षरी ५ शब्द लेखन करता येणे अनुलेखन ४ रेषी मध्ये | स्वतःचा परिचय किमान ५ वाक्यात सांगता येणे |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## ● इयत्ता तिसरी

"चला करूया प्रगत वर्ग " अभियान

निवडीचे निकष

इयत्ता तिसरी

| | | भाषा | | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहिता येणे | कविता सभिनय पाठ असणे १ कविता | विराम चिन्हे युक्त किमान २ वाक्य श्रुतलेखन | चित्रावर आधारित किमान ५ वाक्यात लेखन | शब्दावरून न वाक्य तयार करणे | शब्द संपत्तीवर आधारित प्रश्न शब्दार्थ | तीन अंकी संख्या अंकात व अक्षरात लेखन वाचन करता येणे | ३ अंकी संख्यांची विस्तारित मांडणी करता येणे | ३अंकी संख्या हातच्याची बेरीज | ३ अंकी संख्या हातच्या ची वजाबाकी | दोन अंकी संख्येला एक अंकी संख्येने गुणणे,भागणे | ३अंकी सख्याची बेरीज वजाबाकी शाब्दिकउदाहरणेसोडविता येणे५ पैकी३ | परिचित वाक्यांचे वाचन करतो किमान ५ वाक्ये | १ कविता साभिनय सादर करता येणे | इग्रजी सूचनेनुसार कृती करतो किमान ५ | उतारा अनुलेखन करता येणे | परिचित शब्दांचे स्पेलिंग सांगता येणे | स्वतःचा परिचय किमान ५ वाक्यात सांगता येणे |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## ● इयत्ता चौथी

"चला करूया प्रगत वर्ग " अभियान

निवडीचे निकष

इयत्ता चौथी

| | | भाषा | | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | अपठीत उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहिता येणे | कविता सभिनय पाठ असणे १ कविता | विराम चिन्हे युक्त किमान २ वाक्य श्रुतलेखन | चित्रावर आधारित किमान ३ वाक्यात लेखन/ प्रश्न तयार करणे | दिलेल्या विषयावरून लेखन करता येणे (१० ओळी लेखन ) | अभ्यासक्रमावर आधारित कार्यात्मक व्याकरणातील प्रश्न | पाच अंकी संख्या अंकात व अक्षरात लेखन वाचन करता येणे | ५अंकी संख्या हातच्याची बेरीज | ५ अंकी संख्या हातच्याची वजाबाकी | अंकी संख्येला दोन अंकी संख्येनेगुणणे,तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भागणे | भूमिती त्रिकोण आयत चौरस परिमिती व क्षेत्रफळावर आधारीत उदा.सोडविणे. | अभ्यासक्रमावर आधारित शाब्दिक उदाहरणे सोडविता येणे ,५ पैकी ३ | परिचित वाक्यांचे वाचन करता येणे किमान ५ वाक्ये | १ कविता साभिनय सादर करता येणे | इंग्रजी सूचनेनुसार कृती करतो किमान ५ | तोंडी प्रश्नाची उत्तरे सांगता येणे (उदा.शाब्द,एक्सpressions , | परिचित किमान ५ शब्द श्रुतलेखन करता येणे . | स्वतःचा परिचय किमान ५ वाक्यात सांगता येणे |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## ● इयत्ता पाचवी

"चला करूया प्रगत वर्ग " अभियान

निवडीचे निकष

इयत्ता पाचवी

| | | भाषा | | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | आपल्याला पाठ्यपुस्तकाव्यआधारीत साहित्य(वर्तमानपत्रे ,बालसाहित्य, मोठे फलक)यांचे वाचन करता येणे | अपठीत उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहिता येणे | विराम चिन्हे युक्त किमान २ वाक्य श्रुतलेखन | चित्रावर आधारित किमान ५ वाक्यात लेखन | दिलेल्या शब्दावरूनगोष्ट तयार करता येणे (१० ओळी लेखन ) | कार्यात्मक व्याकरणातील प्रश्न लिंग वचन शब्दाच्या जाती ५ पैकी ३ प्रश्न | सहा अंकी संख्या अंकात व अक्षरात लेखन वाचन करता येणे | ६ अंकी संख्या हातच्याची बेरीज वजाबाकी | विविध भौमितिक आकृत्या ओळखता येणे ५ पैकी ३ | पाच अंकी संख्येला तीन अंकी संख्येने गुणणे | चार अंकी संख्येला दोन अंकी संख्येने भागण | ५ अंकी सख्याची शाब्दिक उदाहरणे सोडविता येणे(नाणीनोटा,मापन, व्यवहारी अपूर्णांकांची बेरीज,वजाबाकी गुणाकार भागाकारच्यी की३ | पाठ्यपुस्तकातील उतारा वाचन करता येणे (३० शब्दापर्यन्तचा) | १ कविता साभिनय सादर करता येणे | परिचित किमान ५ शब्द /२ वाक्ये श्रुतलेखन करता येणे . | शब्द संपत्तीवर आधारित प्रश्न ५ पैकी ३ | riddls वर आधारित प्रश्न ५ पैकी ३ | स्वतःचा परिचय किमान ५ वाक्यात सांगता येणे |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## ● इयत्ता सहावी

**"चला करूया प्रगत वर्ग " अभियान**

**निवडीचे निकष**

**इयत्ता सहावी**

| | | भाषा | | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | बातमी/जाहीरात वाचून विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहिता येणे | शब्द संपत्तीवर आधारित प्रश्न (शब्दार्थ,म्हणी,समूहदर्शक शब्द) | विराम चिन्हे युक्त किमान २ वाक्य श्रुतलेखन | अपूर्ण गोष्ट पूर्ण करता येणे | दिलेल्या मुद्द्यावरुन गोष्ट तयार करता येणे (१० ओळी लेखन ) | अभ्यास क्रमावर आधारित कार्यात्मक व्याकरणातील प्रश्न | सात अंकी संख्या अंकात व अक्षरात लेखन वाचन करता येणे | ७ अंकी संख्या वरील मूलभूत क्रिया करता येणे | व्यवहारी अपूर्णांक व दशांश अपूर्णांका वरील उदाहरणे सोडविता येणे | बैजिक राशीवरील क्रिया करता येणे (कमान २ उदाहरण) | भौमितिक प्रश्न (त्रिकोण, चौकोन,गुणधर्म यावरील उदाहरणे सोडविता येणे ,परिमिती क्षेत्रफळ काढता येणे | शाब्दिक उदाहरणे सोडविता येणे( गुणोत्तर प्रमाण नफा,तोटा ,शेकडेवारी ,सरळव्याज ,५ पैकी ३ | पाठ्यपुस्तकातील उतारा वाचन करता येणे (७० शब्दापर्यन्तचा) | परिचित किमान ५ शब्द /३ वाक्ये श्रुतलेखन करता येणे . | शब्द संपत्तीवर आधारितप्रश्न समानार्थी विरुध्दार्थी लिंग वचन | अभ्यास क्रमावर आधारित कार्यात्मक व्याकरणातील प्रश्न | ३ वाक्यांचे श्रुतलेखन | मजकुराचे भाषांतर करतो. |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## ● इयत्ता सातवी

**"चला करूया प्रगत वर्ग " अभियान**

**निवडीचे निकष**

**इयत्ता आठवी**

| | | भाषा | | | | | | गणित | | | | | | इंग्रजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ.क्र | नाव | बातमी/जाहीरात वाचून विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहिता येणे | शब्द संपत्तीवर आधारित प्रश्न | विराम चिन्हे युक्त किमान २ वाक्य श्रुतलेखन | दिलेल्या विषयावरील संवाद तयार करणे | दिलेल्या मुद्द्यावरुन गोष्ट तयार करता येणे (१० ओळी लेखन ) | कार्यात्मक व्याकरणातील प्रश्न | आठ अंकी संख्या अंकात व अक्षरात लेखन वाचन करता येणे | ८ अंकी संख्या हाताळण्याची बेरीज | ८ अंकी संख्या वरील मूलभूत क्रिया करता येणे | बैजिक राशीवरील क्रिया करता येणे /परिमेय संख्यावरील उदाहरणे सोडविता येणे | भौमितिक प्रश्न (घनफळ ,पृष्ठफळ, प्रमेयावरील प्रश्न सोडविता येणे ,क्षेत्रफळ काढता येणे | शाब्दिक उदाहरणे सोडविता येणे( नफा,तोटा ,शेकडेवारी ,सरळव्याज गुणोत्तर प्रमाण सूट कमिशन ,५ पैकी ३ | पाठ्यपुस्तकातील उतारा वाचन करता येणे (६० शब्दापर्यन्तचा) | इंग्रजी सूचनेनुसार कृती करतो किमान ५ | शब्द संपत्तीवर आधारितप्रश्न | अभ्यास क्रमावर आधारित कार्यात्मक व्याकरणातील प्रश्न | छोट्या उताऱ्याचे श्रुतलेखन | उताऱ्याचे भाषांतर करतो. |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## ● इयत्ता आठवी

कागल तालुक्यामध्ये आठव्या इयत्तेचे जिल्हा परिषद शाळेचे फक्त २ च वर्ग असल्याने आठव्या इयत्तेचे वर्ग या नवोपक्रमामध्ये समाविष्ठ करण्यात आलेले नाहीत.

## सदर नवोपक्रमाची प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल

तरुण भारत

# कागलमध्ये 'प्रगत वर्ग अभियान'

गटशिक्षणाधिकारी डॉ. कमळकर यांची माहिती : १०० टक्के मुले शिकत नसल्याचे स्पष्ट : चांगले काम करणाऱ्या शिक्षकांचा गौरव

सकाळ

# 'चला करू प्रगत वर्ग' राबविणा

डॉ. कमळकर; कागल तालुक्यातील शंभर टक्के मुले प्रगत होण्यासाठी प्र

प्रगतवर्ग निवडण्याचे निकष

केसरी कोल्हापूर

# कागलमध्ये 'चला करु प्रगत वर्ग' अभियान

- गटशिक्षणाधिकारी डॉ. गणपती कमळकर

प्रगतवर्ग निवडण्याचे निकष

महासत्ता

# 'चला करु प्रगत वर्ग ' अभियानात बिद्री केंद्रातील शाळांचे यश

बिद्री, ता. ११ (प्रतिनिधी)–

शिक्षण विभाग पंचायत समिती कागल यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'चला करु प्रगत वर्ग ' अभियानात बिद्री केंद्राने यश मिळविले. केंद्रातील विद्या मंदिर सोनाळी शाळेतील चौथीच्या वर्गाला तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळाला तर विद्या मंदिर बेलवळे बुद्रक शाळेतील पहिलीच्या वर्गाला तृतीय क्रमांक मिळाला.

सोनाळी शाळेतील चौथीच्या वर्गाचे वर्गशिक्षक विश्वनाथ राजाराम डफळे आणि विद्या मंदिर बेलवळे बुद्रक शाळेतील पहिलीच्या वर्गाचे वर्गशिक्षक प्रदीप चंद्रकांत जाधव यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी डॉ. जी. बी. कमळकर यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात पहिल्यांदाच राबविलेल्या या पथदर्शी उपक्रमाला तालुक्यातील दहाही केंद्रातून उत्तम प्रतिसाद मिळाला. यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला गटशिक्षणाधिकारी डॉ. कमळकर यांनी या उपक्रमाबद्दल शिक्षकांमध्ये जागृती करुन सर्वांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते. यानुसार शंभर टक्के प्रगत असलेल्या पहिली ते सातवीच्या वर्गांची दहा केंद्रातून प्रत्येकी एक याप्रमाणे निवड करण्यात आली. तज्ञ कमिटीकडून या वर्गांची तपासणी करुन शिक्षण विभागाने प्रत्येक वर्गातून गुणानुक्रमे तीन क्रमांक जाहीर केले आहेत. या यशासाठी गटशिक्षणाधिकारी डॉ. जी. बी. कमळकर, विस्तार अधिकारी सौ. सारिका कासोटे, आर. एस. गावडे, केंद्रप्रमुख विलास पोवार यांचे मार्गदर्शन तर सोनाळीचे मुख्याध्यापक विजय जांगनुरे, बेलवळे शाळेचे मुख्याध्यापक सुभाष जाधव व सर्व शिक्षकवृंद यांचे सहकार्य लाभले.

MAHASATTA EPAPER
Kolhapur, Sangli, Satara, Belgaum Edition.
Date : 12-03-2023 Page No. - Mahasatta_11

सकाळ

# 'चला करू प्रगत वर्ग' अभियानाचा निकाल जाहीर

## कागलला होणार वर्गशिक्षकांचा गौरव

कागल, ता. १३ : कागल तालुक्यात गटशिक्षणाधिकारी डॉ. गणपती कमळकर यांनी चालू शैक्षणिक वर्षात 'चला करू प्रगत वर्ग' अभियान राबविले. या अंतर्गत तालुक्यातील दहा केंद्रांतील प्रत्येक इयत्तेचे पहिले तीन प्रगत वर्ग निवडण्यात आले. प्रथम तीन आलेल्या वर्ग शिक्षकांचा तालुकास्तरावर प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

प्रत्येक मूल ही राष्ट्राची संपत्ती आहे. त्यामूळे शिक्षणात मुलाला केंद्रबिंदू मानण्यात आले आहे. याचा अर्थ प्रत्येक मूल महत्वाचे आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयानुसार प्रत्येक मूल शिकले पाहिजे, यावर भर देण्यात आला आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन कागल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील शंभर टक्के मुले शिकली पाहिजेत. यासाठी गटशिक्षणाधिकारी डॉ. गणपती कमळकर यांनी चालू शैक्षणिक वर्षात 'चला करू प्रगत वर्ग' अभियान राबविले.

निकाल असा - पहिली - शशिकांत कुंभार (आनूर), आप्पासाहेब वागळे (अर्जूनवाडा), प्रदीप जाधव (बेलवळे बु॥), दुसरी - विवेक गवळी (करड्याळ), शीतल माळी (वानगे), गणपती कुंभार (अर्जुनवाडा), तिसरी - मकरंद कोळी (मुरगूड), सचिन पाटील हमिदवाडा विठ्ठल पाटील कुरणी

चौथी - विश्वनाथ डफळे (सोनाळी), सुनील चौगुले (केनवडे), बाबासो कांबळे (हसुर खुर्द) , पाचवी - गीतांजली कमळकर (भडगाव), सुषमा कदम (चौंडाळ), सविता माने (करनूर), सहावी - बाबूराव राजुगडे (गोरंबे), अजित पाटील (करंजिवणे), उत्तम पाटील (बेलेवाडी काळम्मा), सातवी - अर्चना भरते (म्हाकवे), संभाजी डवरी (बेनिक्रे), सारिका पाटील (सुरुपली).

Kolhapur, Kolhapur-Today
14/03/2023 Page No. 3






https://youtu.be/hIQZPF9jhtQ?si=cANdT07olo-eeDvK

या युट्युब लिंकमध्ये गटशिक्षणाधिकारी यांची प्रगत वर्गाला भेट

## कार्यवाहीचे टप्पे

१. गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मा. शिक्षणविस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख,सर्व शिक्षक संघटना प्रमुख,जि.प.शाळेतील सर्व मुख्याध्यापक यांची जुन २०२२ मध्ये बैठक घेणेत आली.

२. जुलै २०२२ मध्ये केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना या नवोपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली.

२. सप्टेंबर २०२३ च्या पहिल्या आठवड्यात जि.प.शाळेतील सर्व शिक्षकांनी वर्ग स्तरावर स्वयंमूल्यमापन चाचणी घेऊन अप्रगत विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आली.

३. अप्रगत विद्यार्थी संख्या निश्चित केल्यानंतर प्रत्येक शिक्षकांनी प्रत्येक अप्रगत विद्यार्थ्याला किमान अध्ययन क्षमता प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले. हा कालावधी सप्टेंबर २०२२ दुसरा आठवडा ते जानेवारी २०२३ पहिला आठवडा असा निश्चित करण्यात आला होता.

## मूल्यमापन कालावधी

### केंद्रस्तरीय मूल्यमापन :

केंद्रस्तरीय मूल्यमापन डिसेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात केले .

### तालुकास्तरीय मूल्यमापन :

तालुकास्तरीय मूल्यमापन जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात केले .


# ६.नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती(उद्दिष्टानुसार)

## चला करू प्रगत वर्ग अभियान (कागल)

| | १ ली | | २ री | | ३ री | | ४ थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर |
| पट | 2180 | 2180 | 2977 | 2977 | 2490 | 2490 | 2735 | 2735 |
| प्रगत | 1920 | 2079 | 2714 | 2903 | 2114 | 2361 | 2227 | 2550 |
| अप्रगत | 260 | 101 | 263 | 74 | 376 | 129 | 508 | 185 |
| अप्रगत टक्के | 12% | 4.63% | 9% | 2.48% | 15% | 5.18% | 18.50% | 6.76% |

| | ५ वी | | ६ वी | | ७ वी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अभियानापूर्वी | अभियाना नंतर | अभियानापूर्वी | अभियाना नंतर | अभियानापूर्वी | अभियाना नंतर |
| पट | 1950 | 1950 | 1778 | 1778 | 1675 | 1675 |
| प्रगत | 1813 | 1894 | 1641 | 1721 | 1559 | 1620 |
| अप्रगत | 137 | 56 | 137 | 57 | 116 | 55 |
| अप्रगत टक्के | 7% | 2.87% | 7.70% | 3.20% | 6.92% | 3.28% |

## फलनिष्पत्ती — सन २०२२-२३




१. सदर नवोपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे अप्रगत विदयार्थ्यांच्याकडे लक्ष वेधण्यास मदत झाली.

२. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्यास मदत झाली.

३. वरील आलेखाचे अवलोकन केल्यानंतर आपल्या असे दृष्टीस येते की, नवोपक्रम राबविल्यानंतर अप्रगत विद्यार्थी संख्येत इयत्ता निहाय, विषय निहाय घट झालेचे दिसून येते.

४. अप्रगत विद्यार्थ्यांच्याकडे बघण्याचा शिक्षकांचा दृष्टीकोन सकारात्मक झाला.

५. या उपक्रमाची यशस्विता लक्षात घेऊन शालेय शिक्षण विभागाने जुन २०२३ पुणे येथे आयोजित केलेल्या जी–२० कार्यशाळेत सादरीकरणाची संधी देण्यात आली.

६. हा नवोपक्रम कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व जि.प.शाळेमध्ये राबविण्याबाबत जि.प.प्रशासन सकारात्मक आहे.

## चला करू प्रगत वर्ग  नवोपक्रम निकाल

कागल तालुका पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तसेच इयत्ता चौथी व सातवी जिल्हापरिषद प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यात अव्वल स्थानी आहे.यासाठी तालुक्यातील शिक्षक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आणण्यासाठी अथक प्रयत्नकरतात. त्याचबरोबर १००% मुले घडविण्यासाठी शिक्षक प्रयत्नांची पराकाष्ठा करतआहेत. प्रत्येक मूल ही राष्ट्राची संपत्ती आहे हे जाणून घेऊन शिक्षक प्रत्येक मूल प्रगतकरण्यासाठी प्रयत्नशील आहेत.२२ जून २०१५ च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासननिर्णयामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रत्येक मूल शिकले पाहिजे अशी अपेक्षा ठेवलेली आहे.

यासाठी शिक्षण विभाग पंचायत, समिती कागल यांनी सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षापासून चला करू प्रगत वर्ग नवोपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला, यालातालुक्यातील शिक्षकांकडून उस्फफूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अभियानाचे शिक्षण समिती जिल्हा परिषद कोल्हापूरच्या बैठकीत कौतुक करून मान्यतादेण्यात आली.१००% वर्ग प्रगत करणाऱ्या प्रत्येक केंद्रातून प्रत्येक इयत्तेचा एक प्रगत वर्गनिवडण्यासाठी केंद्रप्रमुखांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमण्यात आली होती, या कमिटीमार्फत प्रत्येक केंद्रातून प्रत्येक इयत्तेचा एक प्रगत वर्ग निवडण्यात आला. असे तालुक्यातील दहा केंद्रातून जिल्हा परिषद शाळेतील इयत्तापहिली ते सातवी पर्यंत प्रत्येक इयत्तेचे दहा वर्ग केंद्रस्तरीय कमिटीमार्फत निवडणेत आले होते. केंद्रनिहाय निकाल प्राप्त झालेनंतर प्रत्येक केंद्रप्रमुखांच्या अध्यक्षतेखाली बी.आर.सी.विषयतज्ज्ञ तसेच प्रत्येक केंद्रातील उत्कृष्ट मार्गदर्शक शिक्षक यांची प्रत्येक इयत्तेमधील गुणानुक्रमे प्रथम तीन वर्ग निवडण्यासाठी कमिटीची नेमणूक करण्यात आली होती.



सकाळ

# 'चला करू प्रगत वर्ग' अभियानाचा निकाल जाहीर

## कागलला होणार वर्गशिक्षकांचा गौरव

कागल, ता. १३ : कागल तालुक्यात गटशिक्षणाधिकारी डॉ. गणपती कमळकर यांनी चालू शैक्षणिक वर्षात 'चला करू प्रगत वर्ग' अभियान राबविले. या अंतर्गत तालुक्यातील दहा केंद्रांतील प्रत्येक इयत्तेचे पहिले तीन प्रगत वर्ग निवडण्यात आले. प्रथम तीन आलेल्या वर्ग शिक्षकांचा तालुकास्तरावर प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

प्रत्येक मूल ही राष्ट्राची संपत्ती आहे. त्यामूळे शिक्षणात मुलाला केंद्रबिंदू मानण्यात आले आहे. याचा अर्थ प्रत्येक मूल महत्वाचे आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयानुसार प्रत्येक मूल शिकले पाहिजे, यावर भर देण्यात आला आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन कागल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील शंभर टक्के मुले शिकली पाहिजेत. यासाठी गटशिक्षणाधिकारी डॉ. गणपती कमळकर यांनी चालू शैक्षणिक वर्षात 'चला करू प्रगत वर्ग' अभियान राबविले.

निकाल असा - पहिली - शशिकांत कुंभार (आनूर), आप्पासाहेब वागळे (अर्जूनवाडा), प्रदीप जाधव (बेलवळे बु॥), दुसरी - विवेक गवळी (करड्याळ), शीतल माळी (बानगे), गणपती कुंभार (अर्जुनवाडा), तिसरी - मकरंद कोळी (मुरगूड), सचिन पाटील हमिदवाडा विठ्ठल पाटील कुरणी

चौथी - विश्वनाथ डफळे (सोनाळी), सुनील चौगुले (केनवडे), बाबासो कांबळे (हसुर खुर्द) , पाचवी - गीतांजली कमळकर (भडगाव), सुषमा कदम (चौंडाळ), सविता माने (करनूर), सहावी - बाबूराव राजुगडे (गोरंबे), अजित पाटील (करंजिवणे), उत्तम पाटील (बेलेवाडी काळम्मा), सातवी - अर्चना भरते (म्हाकवे), संभाजी डवरी (बेनिक्रे), सारिका पाटील (सुरुपली).

Kolhapur, Kolhapur-Today
14/03/2023 Page No. 3

प्रत्येक इयत्तेमधील गुणानुक्रमे प्रथम तीन वर्ग निवडण्याचे अधिकार या कमिटीला देण्यात आले होते.सदर कमिटीने केंद्रातून आलेल्या प्रगत वर्गांची पुनर्रपडताळणी करून शिक्षण विभाग, पंचायत समिती कागल कार्यालयाकडे प्रगतवर्गांचा निकाल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सुपूर्द केला. यामध्ये याप्रगत वर्गांच्या निकालामध्ये प्रत्येक इयत्ता नुसार तालुकास्तरीय प्रथम तीन क्रमांककाढण्यात आले. त्यानुसार तालुकास्तरीय कमिटीनेदिलेल्या निकालाची खात्री करुन खालील प्रमाणे वर्गनिहाय प्रथम तीन प्रगतवर्गांची निवड करण्यात येत आहे. वरील मार्गदर्शक शिक्षकांचा शिक्षण विभागपंचायत समिती कागल यांचे वतीने सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.




संजय घोडवत विद्यापिठ अतिग्रे येथे दि.२१।०९।२०२३ रोजी
विभागस्तरीय कार्यशाळेत राज्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सचिव यांच्या
समोर चला करू प्रगत वर्ग नवोपक्रम यशोगाथेचे सादरीकरण करताना.



संजय घोडवत विद्यापिठ अतिग्रे येथे  विभागस्तरीय कार्यशाळेत
राज्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सचिव मा.रणजितसिंह देओल
यांना चला करू प्रगत वर्ग नवोपक्रमाची यशोगाथा भेट देताना

# ७. समारोप

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षात चला करू प्रगत वर्ग अभियानाला उत्स्फूर्द प्रतिसाद मिळाला. आमच्या या नाविन्यपूर्ण अभियानाला प्रसार माध्यमांनी उचलून धरल्यामुळे आपल्या दैनिकात प्रसिद्धी देऊन या उपक्रमाचे चळवळीत रूपांतर होण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. संजयसिंह चव्हाण यांनी आमच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले. तसेच शिक्षणाधिकारी मा.आशा उबाळे यांची देखील प्रेरणा मिळाली या अभियानामुळे तालुक्यातील अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्यास निश्चितपणे मदत झाली. काही शिक्षकांनी प्रेरित होऊन आपल्या वर्गातील १०० टक्के मुले प्रगत केली. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली, शिक्षकांचा या विद्यार्थ्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक झाला, प्रत्येक मूल शिकू शकते हा आत्मविश्वास शिक्षकांच्या मनामध्ये निर्माण झाला, विद्यार्थ्यांच्या मधील न्यूनगंड कमी होऊन त्यांच्यामध्ये शिकण्याची नवी उमेद निर्माण झाली. माणूस जेव्हा आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर चाकोरी सोडून वेगळं काही करतो आणि त्यातून काहीतरी नवनिर्माण घडतं तेव्हा त्याचं ते आयुष्य इतरांसाठी प्रेरक ठरतं. अशी इतरांसाठी प्रेरक ठरणारी प्रगत वर्ग अभियानाची यशोगाथा तयार होत आहे.

कागल तालुका येत्या काही काळातच १०० टक्के प्रगत विद्यार्थी असणारा तालुका होईल याची खात्री वाटते. या यशोगाथेमध्ये ज्यानी सक्रिय सहभाग नोंदवला ज्याना यश मिळाले त्याचबरोबर काही शिक्षकांची शंभर टक्के मुले प्रगत करण्याची संधी थोडक्यात हुकली अशा शिक्षकांचे सुद्धा अनुभव या यशोगाथेत समाविष्ट करण्यात आले आहेत. या अनुभवाचा फ्फ़ायदा इतर गुरूजनांना प्रत्येक मूल प्रगत करण्यासाठी निश्चित पणे होईल. त्यांचे  अनुभव इतरांना ऊर्जादायी, प्रेरणादायी व दिशादर्शक ठरतील अशी आशा वाटते.

## दि.९ जून २०२३ रोजी पुणे येथे शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय जी-२० कार्यशाळेमध्ये सादरीकरण करताना

## गटशिक्षणाधिकारी डॉ.गणपती कमळकर







# ८. संदर्भसूची व परिशिष्ट

## १) संदर्भसूची

१) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय (प्राथमिक ) २२ जून २०१५

२) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय (माध्यमिक ) १६ सप्टेंबर २०१६

३) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय ९ जानेवारी २०१७

४) निपुण भारत शासन निर्णय २७ ऑक्टोबर २०२१

## २) परिशिष्टे

- युट्युब लिंक्स
- गुगल
- विकिपीडिया

# ९. नवोपक्रमामधील यशस्वी शिक्षक यादी

## चला करू प्रगत वर्ग नवोपक्रम निकाल खालीलप्रमाणे

| अ.नं. | इयत्ता | मार्गदर्शक शिक्षकाचे नांव | शाळेचे नांव | प्रगत वर्ग गुणानुक्रम |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ली | श्री.शशिकांत गणपती कुंभार | विद्या मंदिर आणूर | प्रथम |
| 2 | | श्री.आप्पासाहेब शिवाजी वागळे | विद्या मंदिर अर्जुनवाडा | द्वितीय |
| 3 | | श्री.प्रदीप चंद्रकांत जाधव | विद्या मंदिर बेलवळे बुद्रुक | तृतीय |
| 4 | 2 री | श्री.विवेक कल्लाप्पा गवळी | विद्या मंदिर करड्याळ | प्रथम |
| 5 | | सौ.शीतल शिवानंद माळी | विद्या मंदिर बानगे | द्वितीय |
| 6 | | श्री.गणपती लक्ष्मण कुंभार | विद्या मंदिर अर्जुनवाडा | तृतीय |
| 7 | 3 री | श्री.मकरंद मल्लू कोळी | शिवाजी विद्या मंदिर मुरगुड | प्रथम |
| 8 | | श्री.सचिन शामराव पाटील | विद्या मंदिर हमिदवाडा | द्वितीय |
| 9 | | श्री.विठ्ठल शिवाजी पाटील | विद्या मंदिर कुरणी | तृतीय |
| 10 | 4 थी | श्री.विश्वनाथ राजाराम डफळे | विद्या मंदिर सोनाळी | प्रथम |
| 11 | | श्री.सुनील गणपती चौगुले | विद्या मंदिर केनवडे | द्वितीय |
| 12 | | श्री.बाबासो भाऊसो कांबळे | विद्या मंदिर हसुर खुर्द | तृतीय |
| 13 | 5 वी | सौ.गीतांजली गणपती कमळकर | विद्या मंदिर भडगाव | प्रथम |
| 14 | | सौ.सुषमा प्रकाश कदम | विद्या मंदिर चौंडाळ | द्वितीय |
| 15 | | सौ.सविता संदीप माने | विद्या मंदिर रामकृष्ण नगर करनूर | तृतीय |
| 16 | 6 वी | श्री.बाबुराव विठू राजगुडे | विद्या मंदिर गोरंबे | प्रथम |
| 17 | | श्री.अजित शिवाजी पाटील | विद्या मंदिर करंजीवणे | द्वितीय |
| 18 | | श्री.उत्तम बाबासो पाटील | विद्या मंदिर बेलेवाडी काळमा | तृतीय |
| 19 | 7 वी | श्रीमती अर्चना प्रकाश भरते | विद्या मंदिर म्हाकवे | प्रथम |
| 20 | | श्री.संभाजी कृष्णा डवरी | विद्या मंदिर बेनिक्रे | द्वितीय |
| 21 | | सौ.सारिका सुरेश पाटील | विद्या मंदिर सुरूपली | तृतीय |

दिनांक : 22/11/2023

# प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीम/डॉ. गणपती बंडा कमळकर प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ ~~देते~~ की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला चला करु प्रगत वर्ग अभियान हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

स्पर्धकाची स्वाक्षरी
नांव : डॉ.गणपती कमळकर
कार्यालयाचा शिक्का.

दिनांक : 22/11/2023
स्थळ : कागल

शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागाळा पार्क कोल्हापूर

फोन नं- (0231) 2650781
Gmail ID-ssakolhapur1@gmail.com

जा.क्रं.कोजिप/शिक्षण/प्राथ/आस्था-०१/२०२९ /२०२३
शिक्षण विभाग(प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर
दिनांक :-२३/११/२०२३

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, डॉ.गणपती बंडा कमळकर, हे शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद,कोल्हापूर अंतर्गत पंचायत समिती कागल येथे गटशिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत आहेत. डॉ.कमळकर, यांनी " चला करु प्रगत वर्ग अभियान "हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये स्वत: राबविलेला आहे. सदर नवोपक्रमुळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्ता उंचावली आहे. ही या उपक्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक),
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

प्रत
डॉ.गणपती बंडा कमळकर,
गटशिक्षणाधिकारी, पं.स.कागल